# पाणीपुरवठा स्किम

**आवश्यक कागदपत्रे -**

१. ८'अ' प्रमाणे सर्व गटाचे चालु तारखेचे ७/१२ उतारे (२ महिन्यांच्या आतील).

२. ७/१२ प्रमाणे इतर वित्तीय संस्था/बँकांचे मुळ प्रतीत चालु तारखेचे दाखले (२ महिन्यांच्या आतील).

३. संस्था ठराव रिपोर्ट मुख्य कार्यालयाकडील दिलेल्या नमुन्यानुसार संस्थेच्या लेटरपॅडवर.

४. चालु तारखेचा ताळेबंद, परिशिष्ट १,२ व ३ संपुर्ण माहीती अचुक भरुन देणे.

५. कर्ज मागणी अर्ज.

६. मान्यताप्राप्त कंपनीचे/एजन्सीचे कोटेशन.

७. विहीरीवरून पाईपलाईन असलेस विहीर नोंदीचा ७/१२ उतारा.

८. नदी/तलावावरुन पाईपलाईन असलेस ज्या ठिकाणी मोटर बसणार आहे त्या गटाचा ७/१२ उतारा.

९. योजनेच्या सर्व भिज क्षेत्राचा पाटबंधारे विभागाचा दिर्घ मुदतीचा पाणी परवाना व एच. पी. परवाना व सर्व क्षेत्राला ठिबक सिंचन करणार असलेबाबत सभासदाचे हमीपत्र.

१०.पाणी पुरवठा योजनेचा बँकेचे पॅनेलवरील इंजिनिअर यांचा प्रकल्प अहवाल ३ प्रतीत.

११.एम.एस.इ.डी.सी. (महाराष्ट्र विद्युत राज्य वितरण कंपनी) चे कोटेशन व डीपॉझिटरक्कम भरलेची पावती अगर विद्युत कनेक्शन देत असलेबाबतचे वितरण कंपनीचे एच.पी.व गट नं. सही हमीपत्र आवश्यक आहे.

१२.विहीर स्वमालकीची असावी,सामाईकात असलेस इतर हिस्सेदारांचे रु. १००/- मात्रचे स्टॅम्पवरती संमतीपत्र घेणे आवश्यक आहे.

१३.सभासदाचे पुर्वीचे विज कनेक्शन असेल तर गट नंबर व जुने एच.पी. यांचा उल्लेख असलेले विद्युत बील देणे आवश्यक आहे.

१४. विद्‌युत कनेक्शन दुसऱ्याचे जागेत असेल तर त्या जागा मालकाचे रु.१००/- चे स्टँपवर करारपत्र व सदर जागेचा ७/१२ उतारा देणे आवश्यक आहे.

१५. सदर कर्ज पुरवठा हा प्रकल्पाअंतर्गत असलेने व त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार असलेने या कर्जासाठी परतफेड कुवत काढणेची आवश्यकता नाही.

१६. कर्ज प्रकरण शाखेत प्राप्त झालेवर शाखा इन्स्पेक्टर यांनी सदर योजनेची प्रत्यक्ष पहाणी करुन तांत्रीक व अर्थिक बाबींची माहिती घेवून त्याप्रमाणे सविस्तर तपशिल (उदा. पाण्याचा स्त्रोत, विहीरीचे माप, पाणी पातळी, विद्‌युत कनेक्शन, पाईपलाईनची लांबी इ. देणेचा आहे.) शिफारशीमध्ये करणेचा आहे.

याशिवाय इतर निकष अटी-शर्ती या इकडील वेळोवेळी कळविलेल्या परिपत्रकानुसार राहतील.